MHKO100007182013

नियमीत दिवाणी दावा क्र. २००/२०१३

वसंत बाळू कुरळे
विरुध्द
श्री. सिदगोंडा सतगोंडा पाटील वगैरे

## निशाणी क्र. ५९ वर आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला "पुरावा बंद" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, त्यांनी आपला जबाब दिलेला हाता व सदरचे काम वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा पुरावा देणेवर दिनांक २९/११/२०२३ रोजी नेमले होते. परंतु सदर दिवशी वादीतर्फे साक्षीदार नं. २ हे नातेवाईक मयत झालेने बाहेरगांवी जावे लागलेमुळे कोर्टात हजर राहता आले नाही. सबब पुरावा बंदचा आदेश करणेत आला आहे. वादीतर्फे साक्षीदार क्र. २ हे जाणुनबुजून अगर हेतुपुरस्सर कोर्टात गैरहजर राहीलेले नाहीत. सबब अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे सादर केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द खोटा दावा दाखल केला आहे. वादी यांनी प्रतिवादी यांना त्रास देणेसाठी विलंब केलेला आहे. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा व मंजूर करावयाचा झालेस खर्च बसविणेत यावा.

४. दोन्ही बाजुचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे केला आहे.

५. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदर प्रकरण हे सन २०१३ सालचे आहे. वादी व त्यांचे विधीज्ञ गैरहजर असल्यामुळे दिनांक २८/११/२०२३ रोजी वादी यांचा पुरावा बंद

करण्यात आला. प्रस्तुत अर्जाअन्वये वादी यांनी जाणूनबुजून कोणताही विलंब केलेला नाही असे कारण नमुद केलेले आहे. सदर कारण व प्रकरणात झालेला विलंब पाहता सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता पक्षकारांमध्ये पुन्हा नवीन प्रकरण दाखल होऊन गुंतागुंत वाढण्याची शक्यता असल्याने वादीस संधी देणे संयुक्तीक वाटते. वादी यांचेमुळे झालेला विलंब व त्यामुळे प्रतिवादी यांचे झालेले नुकसान याकरीता सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य वाटत आहे. त्यामुळे, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१ प्रतिवादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ३००/- (रुपये तीनशे मात्र) देणेच्या अटीवर अर्ज मंजुर करण्यात येतो.

२ खर्चाची रक्कम वादी यांनी पुढील तारखेपर्यंत प्रतिवादी यांना अदा करावी. तसे न झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

ठिकाण - गडहिंग्लज.
दिनांकः ०१/०२/२०२४.

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.